नवभारत टाइम्स । मुंबई । गुरुवार, 18 जुलाई 2024

**सफल परीक्षण** विमान ने भरी पहली ट्रायल उड़ान, मार्च 2025 तक शुरू हो जाएगी सेवा

# नवी मुंबई एयरपोर्ट पर शुरू हुआ ट्रायल!

**नागमणि पांडेय**

■ **नवी मुंबई :** नवी मुंबई में बन रहे नए एयरपोर्ट पर ट्रायल उड़ान शुरू हो गई है। बुधवार को यहां से पहली उड़ान भरी गई और यह सफल रही। सूत्रों का कहना है कि विमान को सिग्नल प्रणाली का परीक्षण करने के लिए उड़ाया गया है। विमान ने उड़ान ग्लाइडिंग पथ जांच सफलतापूर्वक पूरी कर ली है। एयरपोर्ट का काम तेजी से जारी है और मार्च 2025 तक इससे उड़ानें शुरू होने की उम्मीद है। हालांकि, ट्रायल उड़ान को लेकर नवी मुंबई एयरपोर्ट अथॉरिटी और सिडको ने काफी गोपनीयता बरती है।

नवी मुंबई इंटरनैशनल एयरपोर्ट (एनएमआईएपीए) का निर्माण रायगड जिले में उलवा और पनवेल के बीच 1,600 हेक्टेयर जमीन पर किया जा रहा है। इसमें सिडको नोडल एजेंसी के रूप में काम कर रही है। इसकी अनुमानित लागत 19 हजार 600 करोड़ रुपये है। बुधवार को यहां पहली ट्रायल उड़ान का विडियो भी सामने आया है। भारतीय हवाई अड्डा प्राधिकरण के एक विशेष विमान ने एयरपोर्ट पर सिग्नल प्रणाली के परीक्षण के लिए उड़ान भरी थी। एयरपोर्ट अथॉरिटी के सूत्र का कहना है कि परीक्षण सफल रहा। अभी और भी ट्रायल किए जाएंगे।

**पांच चरणों में पूरा होगा कामः** एयरपोर्ट प्रॉजेक्ट 5 चरणों में पूरा होगा। पहले दो चरणों में प्रतिवर्ष दो करोड़ यात्री क्षमता होगी। पांचवें चरण तक यहां चार टर्मिनल और दो रनवे होंगे। 13 जुलाई को केंद्रीय नागरिक उड्डयन मंत्री किंजरप्पु नायडू और केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोल ने काम की समीक्षा की थी। मोहोल ने कहा था कि प्रतिवर्ष 9 करोड़ यात्रियों की क्षमता वाला यह प्रॉजेक्ट गेम चेंजर साबित होगा। पहले चरण की उड़ान 1 मार्च 2025 से शुरू होगी।



**सभी मार्गों से कनेक्टिविटी**

एयरपोर्ट को एक्सप्रेस वे, हाइवे, उपनगरीय रेल, मेट्रो, हाई स्पीड रेल और जलमार्ग से भी जोड़ा जा रहा है। नवी मुंबई एयरपोर्ट भारत का पहला मल्टी-मॉडल विमानन केंद्र साबित होगा। ठाणे, कल्याण, पुणे, मुंबई और पूरे पश्चिमी महाराष्ट्र को इसका फायदा मिलेगा।

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, गुरुवार, १८ जुलै २०२४ मुंबई तरुण भारत

# नवी मुंबई विमानतळाची चाचणी यशस्वी



## सिग्नलची तपासणी; मार्च २०२५पर्यंत कार्यान्वित होणार

**नवी मुंबई, दि. १७ : प्रतिनिधी**

बहुप्रतीक्षित दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय नवी मुंबई विमानतळावरून बुधवार, दि. १७ जुलै रोजी पहिल्या विमानाने यशस्वी उड्डाण केले आहे. सिग्नल यंत्रणेची चाचणी घेण्यासाठी या विमानाने उड्डाण केले. या विमानाने फ्लाइट ग्लायडिंग पथ तपासणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. यामुळे नवी मुंबई विमानतळाच्या प्रकल्पाच्या प्रगतीतील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण झाला आहे. विमानतळाचं काम प्रगतीपथावर असून पुढील वर्षी मार्च २०२५ पर्यंत हे विमानतळ पूर्णपणे कार्यान्वित होणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या या पहिल्या उड्डाणाचा व्हिडिओदेखील समोर आला आहे.

एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया या कंपनीच्या विशेष विमानाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सिग्नल यंत्रणेची चाचणी घेण्यासाठी हे उड्डाण केले आहे. विमानतळाच्या धावपट्टीवरून अचानक विमानाने उड्डाण घेतल्याचे पाहून परिसरातील लोकांना आश्चर्याचा धक्का बसला. ही चाचणी यशस्वीरित्या पूर्ण झाल्याची माहिती देण्यात आली. यानंतर या चाचणीचा रिपोर्ट मुख्यालयात पाठविण्यात येणार आहे. दरम्यान, नागरी हवाई वाहतूकमंत्री राम मोहन नायडू, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दि. १३ जुलै रोजी अधिकाऱ्यांकडून विमानतळाच्या निर्माण कार्याचा आढावा घेतला होता. या प्रकल्पातील पूर्णत्वाकडे असलेल्या पहिल्या टप्प्यातील टर्मिनलची पाहणी केली. 'नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. या प्रकल्पातील पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या विमानतळाचा पहिला टप्पा मार्च २०२५ पर्यंत प्रवाशांसाठी खुला करण्याचे नियोजन आहे, अशी माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या विमानतळाच्या पाहणीदरम्यान दिली.



CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, गुरुवार
18.7.2024

# नवभारत

खुशखबर | सिग्नल परीक्षण के लिए पहली बार लैंडिंग और टेकऑफ

# नवी मुंबई हवाई अड्डे पर उतरा विमान

**नवी मुंबई, नवभारत न्यूज नेटवर्क.** पनवेल के पास बन रहे नवी मुंबई हवाई अड्डे पर बुधवार को पहली बार किसी विमान ने लैंडिंग की. दरअसल, रनवे पर टेक-ऑफ या लैंडिंग के दौरान कोई बाधा न हो, इस संबंध में हवाई अड्डा प्राधिकरण द्वारा सिग्नल का परीक्षण किया गया. इस दौरान यहां पहली बार विमान उतरा, जिसे देखने के लिए भारी संख्या में स्थानीय लोग उपस्थित थे. मिली जानकारी के अनुसार भारतीय विमानपत्तन प्राधिकरण के एक विशेष विमान ने बुधवार को नवी मुंबई अंतरराष्ट्रीय हवाई अड्डे पर सिग्नल प्रणाली का परीक्षण किया. उक्त मौके पर कई लोग छोटे कैमरे और मोबाइल से विमान की तस्वीरें लेने और वीडियो शूट करने के लिए दौड़ पड़े. जैसे ही लोगों ने विमान को पास आते देखा, सभी ने तालियां बजाकर उसका स्वागत किया. बताया जाता है कि इस परीक्षण की रिपोर्ट भारतीय विमानपत्तन प्राधिकरण मुख्यालय को भेजी जाएगी.



**अदानी समूह कर रहा निर्माण कार्य :** नवी मुंबई अंतरराष्ट्रीय हवाई अड्डा मुंबई का निर्माण अदानी समूह के द्वारा कराया जा रहा है. जो पनवेल क्षेत्र में स्थित एक प्रस्तावित ग्रीन फील्ड हवाई अड्डा परियोजना है.

## एक से ज्यादा एयरपोर्ट वाला शहर होगा मुंबई

यह नवी मुंबई में मुंबई का दूसरा हवाई अड्डा होगा. इसके पूरा होने पर मुंबई भारत का पहला शहर होगा, जिसमें एक से अधिक हवाई अड्डे होंगे. वहीं नवी मुंबई भी हवाई अड्डे का शहर कहलाएगा. इस हवाई अड्डे का निर्माण भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (एएआई) और महाराष्ट्र सरकार के बीच सार्वजनिक-निजी भागीदारी के माध्यम से किया जा रहा है.जुलाई 2016 में भारत के नागरिक उड्डयन मंत्रालय ने नवी मुंबई हवाई अड्डे के लिए साइट की मंजूरी दे दी थी, जिसका निर्माण कार्य अक्टूबर 2016 में सिडको ने शुरू कराया था.




THE TIMES OF INDIA, MUMBAI
THURSDAY, JULY 18, 2024

# Now, flight signal testing begins at Navi Mum airport

**Navi Mumbai:** A flight signal testing of Navi Mumbai International Airport was conducted on Wednesday. "An instrumental landing system was conducted. It is part of the calibration trial," said Navi Mumbai International Airport chief Ketan Vaidya. The airport is proposed to take off from March 2025.

A number of rounds of flight movement were seen. The inspection report of flight signal testing will be sent to the appropriate authorities. Cidco spokesperson Priya Ratambe said, "...we are taking an update from the authorities concerned." Calls and email sent to Directorate General of Civil Aviation and Airports Authority of India did not elicit any response. Adani Group spokesperson too did not respond to call and text message. — **Umesh K Parida**

नवा काळ मुंबई । गुरुवार १८ जुलै , २०२४

# नवी मुंबई विमानतळावर विमानाच्या सिग्नलची चाचणी



■ नवी मुंबई

**नवी मुंबई** विमानतळावर आज प्रथमच विमानाच्या सिग्नलची चाचणी घेण्यात आली. त्यासाठी या विमानतळाच्या धावपट्टीवर विमान आणले. त्यावेळी हे विमान पाहण्यासाठी लोकांची गर्दी झाली होती.

धावपट्टीवर विमान उतरताना किंवा उड्डाण घेताना कोणता अडथळा येत नाही, याची पाहणी करण्यासाठी एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या विशेष विमानाने विमानतळावरच्या धावपट्टीवर सिग्नल यंत्रणेची चाचणी घेण्यात आली. त्यावेळी अनेक लोकांनी मोबाईलने फोटो आणि व्हिडिओ काढण्यासाठी गर्दी केली होती आणि लोकांनी टाळ्या वाजवत या विमानाचे स्वागत केले. या चाचणीचा अहवाल मुख्यालयाला पाठवण्यात आला.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

गुरुवार, दि. १८ जुलै २०२४ कृषीवल



### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

# विमानाने केली सिग्नल चाचणी

। पनवेल । वार्ताहर ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे मल्टिमॉडेल कनेक्टिव्हिटी असणारे देशातील पहिले विमानतळ असणार आहे. या विमानतळावरून मार्च २०२५ मध्ये पहिल्या विमानाचे टेकऑफ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याच पार्श्वभूमीवर आषाढी एकादशीच्या दिवशी म्हणजेच बुधवारी ( दि. १७) नवी मुंबई विमानतळावर विमानाच्या सिग्नलची चाचणी घेण्यात आली. सिग्नल

पान २ वर

### विमानतळाची वैशिष्ट्ये

नवी मुंबई विमानतळ पाच टप्प्यात उभारले जाणार आहे. टप्पा क्रमांक १ आणि २ एकत्रित पूर्ण केले जाणार आहे. यात एक टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे. याअंतर्गत २ कोटी प्रवासी प्रवास करू शकतील, असा अंदाज आहे. टप्पा क्रमांक ३, ४ आणि ५ मध्ये तीन टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे. या टप्प्यानंतर वार्षिक ९ कोटी प्रवासी वाहतूक होईल, असा अंदाज आहे.

## विमानाने केली सिग्नल चाचणी

चाचणीसाठी विमानतळ परिसरात विमान येणार असल्याने पनवेल आणि उरण तालुक्यातील नागरिकांनी गर्दी केली होती. बुधवारी केलेल्या सिग्नल चाचणीचा अहवाल भारतीय विमान प्राधिकरणाला पाठविण्यात येणार आहे.

नवी मुंबई विमानतळ परिसरात पहिल्यांदाच विमानाच्या सिग्नलची चाचणी करण्यात आली. धावपट्टीवर विमान उतरताना किंवा उड्डाण घेताना कोणता अडथळा येत नाही याची पाहणी करण्यासाठी ही चाचणी घेण्यात आली. भारतीय विमान प्राधिकरणाच्या विशेष विमानाने बुधवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सिग्नल यंत्रणेची चाचणी घेतली. विमान पाहण्यासाठी अनेकजण छोटे कॅमेरे व मोबाईल कॅमेऱ्याने फोटो व शुटिंग करण्यासाठी धावून आले. मोलमजुरी करणाऱ्या महिलांमध्ये देखील विमान पाहण्याची उत्सुकता निर्माण झाली होती. त्यांनी आयुष्यात प्रथमच विमान पाहिल्याचा आनंद चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. विमान आपल्याजवळ आल्याचे पाहताच सर्वांनी टाळ्या वाजवत त्याचे स्वागत केले.

**सिडकोचे कामावर लक्ष केंद्रित**

विमानतळ प्रकल्पासाठी वेगवेगळ्या संस्था काम करीत असून प्रत्येकाला तिची जबाबदारी आणि डेडलाइन आखून दिली आहे. त्यादृष्टीने काम सुरू आहे. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी विमानतळ प्रकल्पाच्या कामावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. तीन महिन्यांत त्यांनी जवळपास आठ ते दहा वेळा या प्रकल्पाला भेट देऊन कामाची पाहणी केली आहे. यामुळे रखडलेल्या या प्रकल्पाच्या कामाने वेग घेतला आहे. त्याचा पहिला टप्पा मार्च २०२५ मध्ये पूर्ण होण्याची शक्यता आहे.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

सकाळ मुंबई, गुरुवार, १८ जुलै २०२४

# नवी मुंबई विमानतळावर चार विमानांद्वारे चाचणी

**सकाळ वृत्तसेवा**

नवी मुंबई, ता. १७ : बहुप्रतीक्षित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर बुधवारी (ता. १७) भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि हवाई वाहतूक नियंत्रण विभागाद्वारे चार विमानांद्वारे विशेष चाचणी घेण्यात आली. विमानतळावर तयार केलेल्या धावपट्टीची अचूक रेषा, हवामान आणि सिग्नल यंत्रणा यावेळी तपासण्यात आली. यानंतर सप्टेंबर महिन्यापासून प्रत्यक्ष उड्डाणाची चाचणी सुरू होणार आहे.

सिडकोतर्फे पनवेलनजीक गाढी नदीकिनारी सुमारे १,१६० हेक्टर जागेवर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमान उभारण्यात येत आहे. यासाठी स्थापन केलेल्या नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड (एनएमआयएएल) कंपनीतर्फे १९ हजार कोटी रुपये खर्च करून हे ग्रीनफिल्ड विमानतळ उभे राहत आहे. मार्च २०२५ पर्यंत विमानतळाची एक टर्मिनल इमारत आणि एक धावपट्टी तयार करण्याचे काम वेगाने सुरू आहे. त्यापैकी धावपट्टीचे काम पूर्ण झाले असून धावपट्टीचे रेषा आणि सिग्नल यंत्रणांची चाचणी करण्यासाठी बुधवारी सकाळी चार विमानांच्या मदतीने चाचणी करण्यात आली. सकाळी ११ वाजता दोन लहान आकाराचे विमान धावपट्टीला समतल अंतरावर उडाले. त्यानंतर संध्याकाळी आणखी दोन विमानांनी पाहणी केली. यावेळी ग्लाईडर पाथ व लोकलल्लाईजर टेस्ट अशा दोन चाचण्या घेण्यात आल्या. या चाचणीचा अहवाल गुरुवारी प्राप्त होणार आहे. त्यानंतर ही चाचणी यशस्वी ठरली की नाही, हे निश्चित होईल.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे संकल्पित चित्र

## सप्टेंबरपासून उड्डाणाची चाचणी

सध्या विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. याव्यतिरिक्त विमानतळावरील विविध प्रकारच्या ६० इमारती उभारण्याचे काम प्रगतिपथावर आहे. मार्च २०२५ मध्ये येथून पहिल्या विमानाचे उड्डाण होणार असल्याचे केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. नुकतीच त्यांनी विमानतळाच्या कामाची पाहणी केली. सध्या विमानतळाचे काम प्रगतिपथावर असून सप्टेंबर महिन्यापासून विमानतळावरून प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक विमानांच्या उड्डाणांची चाचणी केली जाईल. पुढील दोन महिने ही चाचणी सुरू राहणार असल्याची माहिती विश्वसनीय अधिकाऱ्यांनी दिली.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

**प्रहार** मुंबई • गुरुवार, १८ जुलै २०२४

# अखेर नवी मुंबईच्या धावपट्टीवरून उडाले विमान

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

## पाच टप्प्यांत उभारले जाणार विमानतळ



राज्यातील बहुचर्चित नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवरून विमान उडताना आणि उतरताना कोणता अडथळा तर येत नाही ना, हे पाहण्यासाठी बुधवारी पहिल्यांदाच भारतीय विमानतळ प्राधिकरणाने सिग्नलसह विमानांची चाचणी घेतली. भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे विशेष विमान नवी मुंबई विमानतळावरून उडणार असल्याचे समजताच परिसरात बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. या चाचणीचा अहवाल मुख्यालयाला पाठविण्यात येणार आहे.

नवी मुंबई विमानतळ पाच टप्प्यांत उभारले जाणार आहे. टप्पा क्रमांक १ आणि २ एकत्रित पूर्ण केले जाणार आहे. यात एक टर्मिनल आणि एक रन-वे असणार आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत हा टप्पा व्यावसायिक वापरासाठी खुला होईल. या अंतर्गत दोन कोटी प्रवासी प्रवास करू शकतील, असा अंदाज आहे. तर टप्पा क्रमांक ३, ४ आणि ५ मध्ये तीन टर्मिनल आणि एक रन-वे असणार आहे. या टप्प्यानंतर वार्षिक ९ कोटी प्रवासी वाहतूक होईल, असा अंदाज सिडकोकडून व्यक्त केला जात आहे. या यशस्वी चाचणीमुळे आता काही महिन्यांनंतर या विमानतळावरून प्रवास करण्याचे नवी मुंबईकरांसह रायगडवासीयांचे स्वप्न साकार होणार आहे.

१३ जुलै रोजी केंद्रीय हवाई वाहतूकमंत्री किंजरापू नायडू आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहळ यांनी विमानतळाच्या कामाचा आढावा घेऊन मार्च २०२५ पासून येथून विमानाचे उड्डाण होणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर बुधवारी अचानक नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवरून ही विमान चाचणी घेण्यात आली. यामुळे विकासक कंपनी आणि सिडकोचा विश्वास दुणावला आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

Hindustan Times MUMBAI THURSDAY JULY 18, 2024

# Testing out a new flying zone



An Airports Authority of India aircraft took part in the instrument landing system (ILS) trials at the upcoming Navi Mumbai International Airport on Wednesday. The ILS provides pilots with both vertical and horizontal guidance while landing. The trials will continue on Thursday. The airport, which is being built by Adani Airports and CIDCO in a public-private partnership model, is scheduled to be opened partially by March 2025.

HT PHOTO

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

नवराष्ट्र | मुंबई, १८ जुलै २०२४



# नवी मुंबई विमानतळावरून पहिल्या विमानाचे उड्डाण

## सिग्नल चाचणी यशस्वी ; काम युद्धपातळीवर सुरू

**पनवेल,** (वा.) नवी मुंबई विमानतळावरील धावपट्टीवर बुधवारी सिग्नल चाचणी यशस्वीरित्या घेण्यात आली. विमानाच्या उड्डाण तसेच उतरताना काही अडथळा तर येत नाही ना, याची चाचपणी करण्यात आली. पनवेलजवळ नवी मुंबई विमानतळाचे काम युद्धपातळीवर सुरू असून, त्याचाच भाग म्हणून बुधवारी ही चाचणी पार पडली. सिडकोद्वारे ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम सुरू आहे. पहिल्या टप्प्यात दरवर्षी १० दशलक्ष प्रवाशांना हाताळण्यास सक्षम असेल, असे सांगण्यात येत आहे. तसेच टप्प्याटप्प्याने ९० दशलक्ष प्रवासी या विमानतळावरून प्रवास करतील, अशाप्रकारे विमानतळाचा विस्तार करण्यात येणार आहे. टेक्सास आधारित जेकब्स अभियांत्रिकी गटाने विमानतळासाठी अंतिम मास्टरप्लॅन तयार केला आहे, तर पॅसेंजर टर्मिनल्स आणि एअर ट्रॅफिक कंट्रोल टॉवरची रचना लंडनस्थित झाहा हदीद आर्किटेक्ट्सने केली आहे.

### उड्डाण पाहण्यासाठी बघ्यांची गर्दी

एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या विशेष विमानाने विमानतळावरून उड्डाण घेतले. हे उड्डाण पाहण्यासाठी बघ्यांची गर्दी झाली होती. यावेळी अनेकांनी आपल्या कॅमेऱ्यामध्ये हा क्षण कैद केला. मोलमजुरी करणाऱ्या महिलांनी, ज्यांनी कधीच जवळून विमान पाहिले नव्हते, त्यांच्यामध्ये हे उड्डाण पाहण्यासाठी उत्सुकता होती.



मुंबई, गुरुवार, १८ जुलै २०२४
लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

# नवी मुंबई विमानतळावर उड्डाणाची चाचणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पनवेल** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर बुधवारी लहान विमानाचे उड्डाण झाल्याची चित्रफीत समाजमाध्यमांवर झळकली. त्यानंतर या बहुचर्चित विमानतळ केंद्र सरकार घोषित केलेल्या मुदतीत सुरू करेल, याबाबतच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. याबाबत सिडको महामंडळाकडे चौकशी केल्यावर विमान धावपट्टीपासून काही अंतरावरून उडविण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## यंत्रणा व्यवस्थित काम करतात का, याची चाचपणी

विमान उतरविताना धावपट्टीवरील उपकरणांच्या यंत्रणा व्यवस्थित काम करतात का याची चाचपणी सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ही चाचणी यशस्वी झाली का याचा अहवाल बुधवारी रात्री उशीरापर्यंत तरी सिडको मंडळाच्या हाती आला नव्हता. दरम्यान, दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवारीही अशा प्रकारची चाचणी केली जाणार आहे.

बहुप्रतीक्षित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा पुढील आठ




महिन्यांत सुरू होत असल्याने बुधवारी सकाळी धावपट्टीवर विमान उतरण्यापूर्वी इन्स्ट्रूमेंटल लॅण्डिंग सिस्टिमची (आय.एल.एस) चाचणी करण्यात आल्याची माहिती सिडको मंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना दिली. तसेच हे विमानतळ सुरू करण्यापूर्वी अशाप्रकारची तांत्रिक चाचण्या यापूर्वीही केल्या असून यापुढेही नित्याने केल्या जाणार असल्याचे गोयल यांनी स्पष्ट केले.

बुधवारी घेतलेल्या चाचणीमध्ये धावपट्टीवर विमान उतरण्यापूर्वी वैमानिकाला धावपट्टीचे अचूक मार्गदर्शन करणारी यंत्रणा योग्य प्रकारे सुरू आहे का, याची माहिती देणारी होती.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत मुंबई, गुरुवार, दि. १८ जुलै २०२४

# विमानाची 'टेस्ट राइड' नवी मुंबईतून टेक ऑफ

## विमानतळावर सिग्नल यंत्रणेची पडताळणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवरून विमान उडताना आणि उतरताना कोणता अडथळा तर येत नाही ना, हे पाहण्यासाठी बुधवारी भारतीय विमानतळ प्राधिकरणाने सिग्नलसह विमानांची चाचणी घेतली. या चाचणीचा अहवाल मुख्यालयाला पाठविण्यात येणार आहे. भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे विशेष विमान नवी मुंबई विमानतळावरून उडणार असल्याचे समजताच परिसरात बघ्यांनी मोठी गर्दी केली होती.

१३ जुलै रोजी केंद्रीय हवाई वाहतूकमंत्री किंजरापू नायडू, राज्यमंत्री मुरलीधर मोहळ यांनी विमानतळाच्या कामाचा आढावा घेऊन मार्च २०२५ पासून येथून उड्डाण होणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार बुधवारी नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवरून ही विमान चाचणी घेण्यात आली.



- नवी मुंबई विमानतळ पाच टप्प्यांत उभारले जाणार आहे. टप्पा क्रमांक १ आणि २ एकत्रित पूर्ण केले जाणार आहे. यात एक टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत हा टप्पा व्यावसायिक वापरासाठी खुला होईल. याअंतर्गत दोन कोटी प्रवासी प्रवास करू शकतील, असा अंदाज आहे. तर टप्पा क्रमांक ३, ४ आणि ५ मध्ये तीन टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे. या टप्प्यानंतर वार्षिक ९ कोटी प्रवासी वाहतूक होईल, असा सिडकोचा अंदाज आहे.

मुंबई । गुरुवार, १८ जुलै २०२४ । mumbai.mtonline.in

# नवी मुंबई विमानतळावर 'रनवे कॅलिब्रेशन'

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

काम सुरू असलेल्या नवी मुंबई विमानतळावरील धावपट्टीची नेमकी लांबी व रुंदी मोजण्याचे काम सध्या सुरू झाले आहे. 'रनवे कॅलिब्रेशन' या नावाने संबोधल्या जाणाऱ्या या कामासाठी विशेष प्रकारच्या साधनसामग्रीचा उपयोग केला जातो. याद्वारे किती वजनाचे विमान किती वेगाने विमानतळावर उतरू शकते, विमान खाली उतरताना त्याच्या चाकांचा स्पर्श सर्वांत आधी नेमक्या कुठल्या भागाला व्हायला हवा, चाके धावपट्टीवर आदळल्यानंतर त्याचा प्रभाव कसा असेल, त्यासाठी धावपट्टीची जाडी किती आहे, आदींचा अभ्यास या 'रनवे कॅलिब्रेशन' अंतर्गत केला जात आहे.

कमी दृष्यमानतेच्या परिस्थितीतही विमानांना खाली उतरता यावे किंवा हवेत झेपावता यावे, यासाठी विमानतळावर 'इन्स्ट्रूमेंट लँडिंग सिस्टीम' (आयएलएस) ही प्रणाली कार्यान्वित असते. या प्रणालीची अत्याधुनिक आवृत्ती (कॅट ३) या विमानतळावर बसवण्यात आली आहे.

## विमानाचे वजन, वेग, धावपट्टीचा अभ्यास



राजेश डांगळे

### असे आहे नवी मुंबई विमानतळ

- **एकूण जमीन :** जवळपास २,८६६ हेक्टर
- **दोन धावपट्ट्या :** प्रत्येकी ३,७०० मीटर लांब व ६० मीटर रुंद
- **टर्मिनल इमारती :** एकूण तीन
- **प्रवासी टर्मिनल क्षेत्रफळ :** १७ हजार चौरस मीटर
- **विमाने उभी करण्याची जागा :** ६७ हजार चौरस मीटर
- **मालवाहतूक जागा :** ५६ हजार ७०० चौरस मीटर
- **प्रवासी क्षमता :** वार्षिक २ कोटी
- **मालवाहतूक क्षमता :** वार्षिक ८ लाख टन

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

प्रातःकाल मुंबई, गुरुवार दि. १८ जुलै २०२४

# अखेर नवी मुंबईच्या धावपट्टीवरुन उडाले विमान

## पाच टप्प्यात उभारले जाणार विमानतळ





**नवी मुंबई, दि. १७ (प्रतिनिधी) :** राज्यातील बहूचर्चित नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवरून विमान उडताना आणि उतरताना कोणता अडथळा तर येत नाही ना, हे पाहण्यासाठी बुधवारी पहिल्यांदाच भारतीय विमानतळ प्राधिकरणाने सिग्नलसह विमानांची चाचणी घेतली. भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे विशेष विमान नवी मुंबई विमानतळावरून उडणार असल्याचे समजताच परिसरात बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. या चाचणीचा अहवाल मुख्यालयाला पाठविण्यात येणार आहे.

नवी मुंबई विमानतळ पाच टप्प्यांत उभारले जाणार आहे. टप्पा क्रमांक १ आणि २ एकत्रित पूर्ण केले जाणार आहे. यात एक टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत हा टप्पा व्यावसायिक वापरासाठी खुला होईल. याअंतर्गत दोन कोटी प्रवासी प्रवास करू शकतील, असा अंदाज आहे. तर टप्पा क्रमांक ३, ४ आणि ५ मध्ये तीन टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे.

या टप्प्यानंतर वार्षिक ९ कोटी प्रवासी वाहतूक होईल, असा अंदाज सिडकोकडून व्यक्त केला जात आहे. या यशस्वी चाचणीमुळे आता काही महिन्यानंतर या विमानतळावरुन प्रवास करण्याचे नवी मुंबईकरांसह रायगडवासियांचे स्वप्न साकार होणार आहे.

१३ जुलै रोजी केंद्रीय हवाई वाहतूकमंत्री किंजरापू नायडू आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहळ यांनी विमानतळाच्या कामाचा आढावा घेऊन मार्च २०२५ पासून येथून विमानाचे उड्डाण होणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर बुधवारी अचानक नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवरून ही विमान चाचणी घेण्यात आली. यामुळे विकासक कंपनी आणि सिडकोचा विश्वास दुणावला आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in